भवतु सब्ब मंगलम्

Reg. No. E0000641(OSM)

# THERA VIPASHANNA TRUST OSMANABAD

Near B. Pharmacy College, Barshi Khanapur Road, Osmanabad-413501.

Ref. No : [illegible]

Date : 16 / 06/2026

प्रति,

मा. प्राचार्य,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

धाराशिव

**विषय:-माहे जुलै 2026 च्या केंद्रस्तरिय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजन करणे बाबत.**

संदर्भ:-1.संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांचे पत्र क्र.राशैसंप्रपम/कला व क्रिडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन 2026-27 दि.29/05/2026

2.मा.आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे परिपत्रक क्र.आशिका/स्विस/मित्र उपक्रम/2019-2020/4856 दि.08 ऑगस्ट 2019

महोदय,

कृपया उपरोक्त संदर्भिय पत्रकांचे अवलोकन व्हावे.(प्रत सोबत जोडली आहे) ज्यानुसार माहे जूलै 2026 च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. धाराशिव जिल्हयात थेरा विपश्यना ट्रस्ट तुळजापूर येथे कार्यरत आहे. या केंद्रावर विपश्यना शिबिरांचे आयोजन केले जाते. तेथे जिल्हयातील व इतर लोक सुध्दा लाभ घेतात.

केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी मार्फत शिक्षकांचे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच वरिष्ठ अधिका-यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. जेणे करुन ते प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण देऊ शकतील यासाठी थेरा विपश्यना ट्रस्ट तुळजापूर येथील केंद्राच्या ठिकाणी अथवा आपल्या सोयीनुसार योग्य त्या ठिकाणी केंद्रप्रमुख व इतर अधिका-यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करुन त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करु. कृपया आपण या बाबत योग्य ते आदेश निर्गमित करावेत ही विनंती.

धन्यवाद.

प्राप्त
16/6/2026.

आपला कृपाभिलाषी

( बाबासाहेब जानराव)

**सचिव**

**थेरा विपश्यना ट्रस्ट धाराशिव**

रा.तांबरी विभाग, बी फॉर्मसी कॉलेज जवळ धाराशिव

मो.न. 8830121193

# जिल्हा कार्यालय समग्र शिक्षा
# जिल्हा परिषद धाराशिव

जा.क्र./सशिधा/समु/ 93 /2026

दिनांक: 07 /08/2026

प्रति.

गटशिक्षणाधिकारी ,
पंचायत समिती --------(सर्व) जि.धाराशिव

विषय : मित्रउपक्रम प्रशिक्षण आयोजन करणेबाबत.

संदर्भ - १.शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.संकीर्ण २०११(२९६/११) माशि-३ मंत्रालय मुंबई दिनांक २७ जानेवारी २०१२
२.मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे जाक्र/आशिका/स्व◌िस/मित्र उपक्रम/२०१९-२०/४८५६ दिनांक ०८ ऑगष्ट २०१९
३.मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र जाक्र /राशैसंप्रपम /कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/२०२६-२७ दिनांक २९/०५/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयी अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, मित्रउपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर उपक्रमातंर्गत शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना आनापान साधनेचे अंदाजित ३ तासाचे प्रशिक्षण देऊन दररोज १० मिनिटाचा सराव करावयाचा आहे. यासाठी शासनाचे २७ जानेवारी २०१२ रोजीचे सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. त्यानंतर वेळोवेळी याबाबत शिक्षण विभागाने परिपत्रक काढून हा उपक्रम राबविण्यात येणाऱ्या अडचणी दूर केलेल्या आहेत. सदरचा कार्यक्रम सर्व इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा मानसिक व बौध्दीक वाढीकरिता उपयुक्त ठरणार आहे.

मित्र उपक्रम प्रशिक्षणाचे वेळापत्रक पुढील प्रमाणे

| अक्र | दिनांक | वेळ | स्थळ/स्तर | तालुका | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२/०८/२०२६ | स.११.३० ते दु.३.३० | डायट धाराशिव | तुळजापूर,लोहारा,वाशी,कळंब | गशिअ केंद्रप्रमुख |
| २ | १३/०८/२०२६ | स.११.३० ते दु.३.३० | डायट धाराशिव | धाराशिव,भूम,उमरगा,परंडा | गशिअ केंद्रप्रमुख |

टीप- सर्व प्रशिक्षणार्थी यांनी वेळेत येणे बंधनकारक आहे.

( सुधा साळुंके )
शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद धाराशिव

( डॉ.रविंद्र खंदारे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद धाराशिव

( डॉ.दयानंद जटनुरे)
प्राचार्य
जि.शि.व प्र.सं.धाराशिव

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर :-
१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. धाराशिव.
२. मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

कार्यवाहीस्तव -
१.मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा.खानापूर आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त शिक्षक श्री.नागसेन शिंदे यांना प्रशिक्षणासाठी आदेशित करावे.
२.श्री.बाबासाहेब जानराव सचिव - थेरा विपश्यना ट्रस्ट धाराशिव यांना कळविण्यात येते की, आपण सदर प्रशिक्षणासाठी उपसिथत राहून मार्गदर्शन करावे.